# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

**शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग) विस्तारीत क्रमांक : १२२**



## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (५) (द) मध्ये महाविद्यालय विकास समितीने दि. ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करील आणि तो अशा महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास व विद्यापीठास सादर करील, अशी तरतूदर आहे. या तरतूदीच्या अनुषंगाने दरवर्षी अहवाल सादर करावयाचा आहे. परंतू शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचा अहवाल काही महाविद्यालयाने विद्यापीठास सादर केलेला नाही.

यास्तव सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्य/ संचालक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयाने **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षाचा "महाविद्यालय विकास समितीच्या" बैठकीचा वार्षिक अहवाल या कार्यालयाकडे अद्याप पर्यंत सादर केलेला नाही. त्या महाविद्यालयांनी दि. ३१/०७/२०२२ पर्यंत सादर करावा.**

तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, यापूढेही अधिनियमातील तरतूदीच्या अनुषंगाने दि. ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षाचा आपल्या महाविद्यालयाचा महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीचा अहवाल **त्या-त्या वर्षाच्या ३१ जुलै पर्यंत या कार्यालयास सादर करावा.**

सदर बाबत जी महाविद्यालये उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन/-

**(डॉ. सु.कि. पवार)**
प्र. कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२ / 5280
दिनांक : 12 JUL 2022

**प्रति,**
मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Documents and Settings\pray\Desktop\Aghav K.G\cdc ahwal circular.doc